# सत्याचा खडा

लेखक: रॉबर्ट लुईस स्टिव्हन्सन

चित्रे: उरी शलव्हित्झ



# सत्याचा खडा

थोरला भाऊ सत्याची पारख करणारा खडा शोधण्यासाठी घराबाहेर पडतो. हा खडा शोधला की त्याला एक राजकुमारी तसेच एक राज्य प्राप्त होईल. अस्सल खडा मिळण्याआधी तो बरेच नकली खडे गोळा करतो. पण घरी परतल्यावर पाहातो तर त्याच्या धाकट्या भावानेच राजकुमारीशी लग्न केलेले असते.

तो खूप दु:खी होतो. पण सत्याचा खडा त्याला दाखवतो की त्याचा धाकटा भाऊ व राजकुमारी उथळ आणि खोटे आहेत. तसेच, आयुष्यातील खरा आनंद व परिपूर्णता सत्याची अनुभूती घेण्यामध्ये आहे, राज्य आणि राजकुमारी प्राप्त करण्यात नाही.



मराठी अनुवाद: सुशील मेन्सन

सत्य ही आपल्या जीवनाला मिळालेली एक सुंदर आणि मौल्यवान भेट आहे. सत्य कधी आनंद देते तर कधी दु:ख! पण ते मनुष्याला दृढ आणि सजग बनवते, हे निश्चित!

या कथेत, राजकुमारी आणि राज्य प्राप्त करण्याकरीता *सत्याचा खडा* शोधण्यास थोरला भाऊ घराबाहेर पडतो. अस्सल खडा मिळाल्यावर तो घरी परततो तेव्हा त्याला आपण बक्षीस गमावलेले आहे, असे दिसते. त्याचा धाकटा भाऊच राजकुमारीशी लग्न करून राजा बनलेला असतो. सुरुवातीला थोरल्या भावाला अक्षरश: रडू येते. मग तो सत्याचा खडा त्यांच्याकडे वळवतो. तेव्हा त्याला दिसते की त्याचा धाकटा भाऊ आणि राजकुमारी यांना कोणतीच प्राप्ती झालेली नाही. त्यांचे आयुष्य अपूर्णच होते. खड्याच्या प्रकाशात त्याला भावाचे आणि राजकुमारीचे खरे रुप दिसते. ते पाहून तो मुक्त होतो आणि जगाचे सत्य जाणून घेण्यास उत्सुक होतो. सत्याचा खडा शोधण्याच्या प्रवासात त्याला अनेक नकली खडे मिळालेले असतात. त्यांनी त्याला जगाचे अर्धवट सत्य दाखवलेले असते. पण हे खडेसुद्धा सत्याच्या खड्याच्या प्रकाशात सुंदर दिसतात. अर्थात, सारे नकली खडे एकत्र गोळा झाले की त्यांचे हे सौंदर्य लुप्त होते. त्याला उमगते की अर्धवट सत्ये एकमेकांचे खंडन करत राहातात. अस्सल खडा मात्र आपल्यासोबत सतत असलेल्या सत्याची अनुभूती देतो आणि अर्धवट सत्यांबद्दल सजग करतो.

ही एक दंतकथा आहे. *आर. एल्. स्टीव्हन्सन* यांनी अशा अनेक कथा लिहिलेल्या आहेत.



राजा आपल्या प्रजेमध्ये लोकप्रिय होता. त्याचे हास्य अतिशय मोहक होते. पण तो मनाने संकुचित होता. राजाला दोन मुले होती. धाकटा मुलगा त्याचा लाडका होता. पण थोरल्या मुलाचे त्याला भय वाटत असे.



एके दिवशी सकाळ होण्यापूर्वीच किल्ल्यात नगारा वाजू लागला. राजा आपल्या दोन राजपुत्रांसोबत घोड्यावर स्वार होऊन निघाला. त्यांच्या पाठोपाठ शूर सैनिकांची पलटण चालू लागली. दोन तास प्रवास केल्यावर ते एका तपकिरी, उंच पर्वताच्या पायथ्यापाशी पोहोचले.

“आपण कुठे चाललोय?” थोरल्या राजपुत्राने विचारले. “

“या तपकिरी पर्वताच्या पलिकडे,” राजा म्हणाला आणि स्वत:शीच हसला.

“आपण काय करतोय, हे बाबांना चांगलं ठाऊक असतं,” धाकटा राजपुत्र म्हणाला.

मग आणखी दोन तास प्रवास करून ते एका काळ्याशार, खोल नदीच्या किनारी पोहोचले.

“आपण कुठे चाललोय?” थोरल्याने विचारले. “

“या काळ्या नदीपल्याड,” राजा म्हणाला आणि मंदपणे हसला.

“आपण काय करतोय, हे बाबांना चांगलं ठाऊक असतं,” धाकटा म्हणाला.

दिवसभर प्रवास केल्यावर सूर्यास्तावेळी ते एका तळ्याकाठी आले. तिथे एक विशाल किल्ला होता.

“पोहोचलो आपण,” राजा म्हणाला. “हे आहे एका राजाचे घर आणि एका पुजाऱ्याचेसुद्धा! याच घरी तुम्हाला खूप काही शिकायला मिळेल.”



किल्ल्याच्या द्वारावर तेथील राजा, जो एक पुजारीसुद्धा होता, सर्वांना भेटला. पुजारी राजा गंभीर प्रकृतीचा होता. त्याच्या शेजारी त्याची मुलगी उभी होती, अतिशय गोरीपान आणि सुंदर! मोहक स्मित करून तिने नजर झुकवली.

“हे माझे दोन राजपुत्र,” पहिला राजा म्हणाला.

“आणि ही माझी मुलगी,” पुजारी राजा म्हणाला.

“तुमची मुलगी खूप सुंदर आहे,” पहिला राजा म्हणाला, “तिचं स्मित मला खूप आवडलं.”

“तुमची मुलं धष्टपुष्ट आहेत. मला त्यांचा शांतपणा आवडला,” पुजारी राजा म्हणाला.

मग दोन्ही राजे एकमेकांकडे पाहात म्हणाले, “काही होऊ शकेल बहुधा.”



दरम्यान, दोघा भावांनी राजकुमारीला पाहिले. एका भावाचा चेहरा फिका पडला आणि दुसऱ्याचा लाल झाला. मुलगी मात्र खाली जमिनीकडे नजर लावून हसत होती.

“तिने माझ्याकडे पाहून स्मित केलं! मी हिच्याशीच लग्न करणार,” थोरला राजपुत्र म्हणाला.

धाकट्या राजपुत्राने आपल्या वडिलांची बाही खेचली. “बाबा, तुमच्या कानात काही सांगायचंय. मी याच मुलीशी लग्न करीन. कारण तिने माझ्याकडे पाहून स्मित केलं.”

“तुझ्या कानात काही सांगतो, ऐक,” त्याचे वडील म्हणाले, “धीर धर. संधीचं सोनं कर, यश तुझंच असेल.”



मग किल्ल्याच्या आत येऊन त्यांनी भोजन केले. एवढे मोठे घर पाहून दोन्ही भाऊ थक्क झाले. मेजाच्या एका बाजुला चेहऱ्यावर शांत भाव असलेला पुजारी राजा बसला होता. मुले त्याच्याकडे आदराने पाहू लागली. आपली नजर झुकवून सेविका त्यांना भोजन वाढत होती. हे दृश्य पाहून मुलांची मने प्रसन्नतेने भरून आली.



पुढल्या दिवशी थोरला राजपुत्र सूर्योदयापूर्वीच उठला. त्याला राजकुमारी विणकाम करत असताना दिसली. साहजिक आहे, ती खूप कामसू होती.

“राजकुमारी,” तो म्हणाला, “तुझ्याशी लग्न करायला मला आवडेल.”

“याबाबत माझ्या वडिलांशी बोला,” म्हणत ती स्मित करत एकटक जमिनीकडे पाहू लागली. तिचा चेहरा गुलाबी झाला.

“तिलाही माझ्याविषयी प्रेम वाटतंय,” थोरला राजपुत्र म्हणाला आणि तळ्याकाठी जाऊन आनंदाने गुणगुणू लागला.

थोड्या वेळाने धाकटा राजपुत्र आला. “राजकुमारी,” तो म्हणाला, “आपल्या दोघांच्या वडिलांची संमती असेल तर मला तुझ्याशी लग्न करायला आवडेल.”

“याबाबत माझ्या वडिलांशी बोला,” म्हणत ती स्मित करत एकटक जमिनीकडे पाहू लागली. तिचा चेहरा गुलाबी झाला.

“किती कर्तव्यतत्पर आहे ही!” धाकटा राजपुत्र म्हणाला, “ही एक आज्ञाधारक पत्नी बनू शकेल. पण आता मी काय करायला हवं?” त्याला आठवले की तिचे वडील पुजारी आहेत. मग मंदिरात जाऊन त्याने देवतेला मुंगुस आणि ससा बळी चढवले.



लवकरच ही वार्ता राज्यात पसरली. पुजारी राजाने पहिला राजा आणि त्याच्या दोन राजपुत्रांना भेटायला बोलावले. पुजारी राजा एका उंच सिंहासनावर बसला होता.

“मला संपत्तीची पर्वा नाही,” पुजारी राजा म्हणाला, “आणि सत्तेचीही हाव नाही. इथे आपण भौतिक वस्तुंच्या छायेत राहातोय. त्याने आपलं मन उबून गेलंय. आपण वाऱ्यावर वाळत घातलेल्या वस्त्रांसारखे झालोय. आपलं हृदय या वाऱ्याने छिन्न-विछिन्न केलंय. पण माझी सत्य या मूल्यावर फार श्रद्धा आहे. मी माझ्या मुलीचं लग्न त्याच मुलाशी लावून देईन जो मला *सत्याचा खडा* आणून देईल. या खड्याच्या प्रकाशात बाह्य मुखवटा लुप्त होतो आणि खरा चेहरा उघड होतो. मुलांनो, माझ्या मुलीशी लग्न करायचं असेल तर मला हा सत्याचा खडा शोधून आणा.



"मला तुमच्या कानात काही सांगायचंय," धाकटा राजपुत्र वडिलांना म्हणाला. "मला वाटतं, आपल्याला या खड्याची आवश्यकता नाही."

"मलाही तुझ्या कानात काही सांगायचंय," त्याचे वडील म्हणाले. "तू म्हणतोयस ते मान्य आहे. पण आत्ता गप्प बसणं ठीक!" त्याने पुजारी राजाकडे पाहून छान स्मित केले.

थोरला राजपुत्र मात्र उठून उभा राहिला आणि पुजारी राजाला त्याने 'पिता' असे संबोधले. "तुमच्या मुलीशी माझं लग्न होवो न होवो, पण आजपासून मी तुम्हाला पिता म्हणूनच हाक मारणार. कारण तुम्ही विवेकी विचार करता. याच क्षणी मी सत्याचा खडा शोधण्यासाठी निघतो." थोरल्या राजपुत्राने सर्वांचा निरोप घेतला आणि तो जगप्रवासाला निघाला.



“मलाही त्या खड्याचा शोध घेण्यासाठी जावंसं वाटू लागलंय,” धाकटा राजपुत्र म्हणाला, “मला निरोप द्या. कारण मला राजकुमारीशी लग्न करायचंय.”

“माझ्यासोबत घरी चल,” त्याचे वडील म्हणाले.

ते घरी परतले. किल्ल्यात परतल्यावर राजा धाकट्या राजपुत्राला घेऊन खजिन्याच्या खोलीत गेले. राजाने राजपुत्राच्या हातात एक वस्तू दिली. “हाच तो खडा आहे जो सत्याचे दर्शन घडवतो. कारण प्रत्यक्ष सत्याव्यतिरिक्त इतर कुठलंच सत्य अस्तित्वात नसतं.”

धाकट्या राजपुत्राने त्या वस्तुमध्ये पाहिले. त्यात त्याला आपला चेहरा जसा आहे अगदी तसाच दिसला. त्याला समाधान वाटले. ती वस्तू म्हणजे एक आरसा होता.

“सत्याचा खडा शोधणं काही फार कठीण काम नव्हतं,” राजपुत्र म्हणाला, “हा आरसा देऊन मला राजकुमारीशी लग्न करता आले, तर माझी काहीच तक्रार नाही. पण माझा मोठा भाऊ किती मूर्ख आहे! जी वस्तू घरीच उपलब्ध आहे, ती शोधायला तो जगप्रवासाला गेला.”



मग राजा आणि धाकटा राजपुत्र पुन्हा पुजारी राजाच्या किल्ल्यात गेले. त्यांनी पुजारी राजाला आरसा दिला. पुजारी राजाने त्यात बघितले तेव्हा त्याला आपण राजा आहोत, आपले घर राजवाडा आहे असे दिसले. इतर सर्व गोष्टीसुद्धा त्यात आहेत तशाच दिसल्या. मोठ्याने ओरडून पुजारी राजाने देवाचे आभार मानले. “आत्ता मला उमगलं, प्रत्यक्ष दिसतं तेच सत्य असतं. माझं मन शंका उपस्थित करत असलं तरी मी एक राजा आहे, हेच खरं!” मग पुजारी राजाने आपले मंदिर पाडून एक नवीन मंदिर बांधले. यानंतर त्याने आपल्या मुलीचे लग्न धाकट्या राजपुत्राशी लावून दिले.



या दरम्यान थोरल्या राजपुत्राने सत्याची पारख करणारा खडा शोधत जग पालथे घातले. जिथे कुठे जाईल तिथे त्याने लोकांना सत्याचा खडा कुठे मिळेल, हे विचारले. पण सर्वत्र त्याला एकच उत्तर मिळाले, “आम्ही आजवर अशा खड्याबद्दल कधी ऐकलंच नाही. पण खरंतर असा खडा आपल्या प्रत्येकाकडेच असतो. घरातल्या चिमणीजवळ लटकत असतो तो.” खुश होऊन थोरल्या राजपुत्राने तो खडा दाखवायला सांगितले. बऱ्याचदा लोक त्याला आरसा दाखवत. त्यात वस्तू आहेत तशाच दिसत. मग राजपुत्र म्हणे, “हा सत्याचा खडा नाही. कारण जे दिसतं त्यापेक्षा सत्य फार वेगळं असतं.” काहीवेळा लोक राजपुत्राला कोळशाची रास दाखवत. त्यात तर काहीच दिसत नसे. मग राजपुत्र म्हणे, “हा सत्याचा खडा नव्हे. कारण त्यात काहीतरी दिसलं पाहिजे.”



आणि कधीकधी राजपुत्राला खरोखरीचे खडे दिसत. विविध रंगछटांनी युक्त, चमकदार, आकर्षक, सर्व बाजुंनी झगमगणारे खडे कुणाकडे दिसले की राजपुत्र त्यांच्याकडे खडे मागून घेत. तेथील लोक राजपुत्राला खडे देतही असत. कारण भेटवस्तू देण्यात ते उदार होते. यामुळे राजपुत्राचे खिसे खड्यांनी भरून गेले. घोड्यावर स्वार होऊन जाताना या खड्यांचा खणखण आवाज येऊ लागला. वाटेत थांबून तो खिशातून खडे बाहेर काढून पाहू लागला. पवनचक्कीच्या शिडासारखे त्याचे डोके इथे-तिथे हलू लागले.



“या सगळ्या उद्योगाचा सर्वनाश होवो,” थोरला राजपुत्र निराश होत म्हणाला, “हा शोध संपतच नाहीये. माझ्याकडे लाल, निळे आणि हिरवे खडेसुद्धा आहेत. पण ते आकर्षक दिसत असले तरी काही कामाचे नाहीत. खरंच, या उद्योगाचा सर्वनाश होवो. हा उद्योग, मी पिता मानलं त्या पुजारी राजासाठी नसता, मला गुणगुणायला लावणाऱ्या आणि माझं मन विशाल करणाऱ्या त्या सुंदर राजकुमारीसाठी नसता, तर मी समुद्रात बुडवून टाकला असता, मग घरी परतलो असतो आणि राजा बनून जगलो असतो.”

राजपुत्राची अवस्था टेकडीवर हरीण पाहिलेल्या शिकाऱ्यागत झाली. रात्र होवो की आग लागो की घरात दिवे लागोत, शिकाऱ्याच्या नसानसांत हरीण मारण्याची इच्छा दौडत राहाते.



कित्येक वर्षांनंतर थोरला राजपुत्र समुद्रकिनारी आला. ती रात्रीची वेळ होती आणि ते ठिकाण निर्जन होते. समुद्राच्या लाटांची गाज ऐकू येत होती. तिथे त्याला एक घर सापडले. घरात मेणबत्तीच्या मिणमिणत्या प्रकाशात एक माणूस बसला होता. थोरला राजपुत्र त्याच्याजवळ गेला. त्या माणसाने त्याला प्यायला पाणी दिले. त्याच्याकडे भाकरी नव्हती. राजपुत्राने त्याला काही विचारले तेव्हा त्याने शब्द न उच्चारता फक्त डोके हलवले.

"तुमच्याकडे सत्याचा खडा आहे का?" राजपुत्राने त्याला विचारले. माणसाने डोके हलवले, "मला कळायला हवं होतं," राजपुत्र खेकसला. "माझा खिसा खड्यांनी भरलाय," म्हणत तो असहायपणे हसू लागला.

मग तो माणूससुद्धा हसू लागला आणि त्यामुळे मेणबत्ती विझली.

"झोप जा," माणूस म्हणाला, "तू खूप प्रवास केलायस, तुझा शोध पूर्ण झालाय आणि माझी मेणबत्ती विझलीय."



सकाळ झाल्यावर त्या माणसाने राजपुत्राच्या हातात एक खडा दिला. तो ना सुंदर होता, ना रंगीत! राजपुत्राने खड्याकडे तुच्छतेने पाहिले. त्याला तो खडा सामान्य वाटला. निराशेने मान हलवत तो निघाला.

दिवसभर त्याने घोड्यावरून प्रवास केला. त्याचे मन शांत झाले होते. सत्याचा खडा शोधण्याची त्याची इच्छा शमली होती. “हा सामान्य खडाच सत्याचा खडा असला तर!” तो मनाशी म्हणाला. मग तो घोड्यावरून खाली उतरला आणि त्याने आपला खिसा रस्त्याकडेला रिकामा केला.



एकमेकांच्या प्रकाशात साऱ्या खड्यांनी आपले रंग आणि चमक गमावले. सकाळ होताच तारे कसे शुष्क होतात, तशीच त्या खड्यांची अवस्था झाली. पण सामान्य खड्याच्या प्रकाशात त्यांचे सौंदर्य अबाधित राहिले. तो सामान्य खडा सर्वात जास्त चमकत होता. राजपुत्र कपाळावर हात मारत ओरडला, “अरे, हेच सत्य आहे की काय! सगळे खडे थोडे थोडे सत्याचे खडे आहेत!” त्याने तो खडा हातात घेऊन त्याचा प्रकाश आकाशावर टाकला. आकाश आता जास्त गहिरे दिसू लागले. मग त्याने खडा पर्वताकडे  वळवला. पर्वत कठीण आणि मजबूत दिसू लागले, पण ते परिपूर्ण जीवन जगत होते. मग त्याने खडा मातीकडे वळवला आणि थोड्या धास्तीने आणि थोड्या आनंदाने मातीला निरखले. शेवटी त्याने खडा स्वतःकडे वळवला आणि गुडघ्यावर बसून देवाची प्रार्थना केली.

“देवा तुझे आभार,” राजपुत्र म्हणाला, “मला सत्याचा खडा गवसला. आता मी माझ्या राज्यात परतेन, पुजारी राजाकडे आणि मला गुणगुणायला लावणाऱ्या, माझं मन विशाल करणाऱ्या राजकुमारीकडे जाईन.”



थोरला राजपुत्र आपल्या किल्ल्यात परतला तेव्हा तिथे काही लहान मुले खेळत होती. त्याला पूर्वीचे दिवस आठवले आणि त्याच्या चेहऱ्यावरचे हास्य मावळले. “इथे माझी मुले खेळत असायला हवी होती,” त्याच्या मनात आले. तो राजवाड्यात शिरला तेव्हा त्याचा धाकटा भाऊ एका उंच सिंहासनावर बसला होता आणि त्याच्या शेजारी राजकुमारी बसली होती. ते पाहाताच, “धाकट्याच्या जागी मी असायला हवा होतो आणि राजकुमारी माझ्या शेजारी असायला हवी होती,” असे वाटून त्याला संताप आला.

“तू कोण आहेस?” धाकट्या राजपुत्राने विचारले. “तू या किल्ल्यात कशासाठी आलायस?”

“मी तुझा मोठा भाऊ आहे,” थोरला राजपुत्र उत्तरला. “मी राजकुमारीशी लग्न करण्यासाठी आलोय. कारण मी सत्याचा खडा मिळवलाय.”



हे ऐकून धाकटा राजपुत्र मोठमोठ्याने हसत म्हणाला, “मी तर सत्याचा खडा कित्येक वर्षांपूर्वीच मिळवला आणि राजकुमारीशी लग्न केलं. बाहेर खेळणारी चार मुलं आमचीच आहेत.”

थोरल्या राजपुत्राचा चेहरा पडला. “सत्याचा खडा शोधण्यात माझं आयुष्य संपलं. मला न्याय मिळायला हवा,” तो अजीजीने म्हणाला.

“न्याय!” धाकटा राजपुत्र उद्गारला. “माझ्या न्याय्यबुद्धीवर किंवा आपले वडील असलेल्या राजावर शंका घेणे तुला शोभत नाही. तू अस्वस्थ आणि भटका माणूस आहेस. आम्ही इथेच राहून राज्य सांभाळतोय, सर्व लोक जाणतात.”

“नाही,” मोठा भाऊ म्हणाला, “तुझ्याकडे सगळं काही आहे. धीराने ऐक, मी काय बोलतो ते. जग खड्यांनी भरलेलं आहे. आणि त्यातला सत्याचा खडा कोणता, हे ओळखणं सोपं नाही.”

“ते काही मला माहित नाही. हा घे माझा सत्याचा खडा. त्यात डोकावून बघ,” धाकटा भाऊ म्हणाला.

मोठ्या भावाने आरशात पाहिले आणि तो चकीत झाला, दुःखात बुडाला. तो वृद्ध झाला होता. त्याच्या डोक्यावरचे केस पांढरे झाले होते. मग खाली बसून तो मोठ्याने आक्रोश करू लागला.



“बघ,” धाकटा भाऊ म्हणाला, “किती मूर्खपणा केलायस तू! जी वस्तू आपल्या खजिन्यात होती ती शोधायला तू सारं जग पालथं घातलंस आणि परतलास ते म्हातारा होऊन! इथले कुत्रे तुला पाहून भुंकतायत. तुझ्याकडे ना पत्नी आहे, ना मुल. मी कर्तव्यतत्पर आणि शहाणा होतो म्हणून आता मी राजा आहे, माझ्याकडे सर्व काही आहे, माझ्या संसारात मी सुखी आहे, आनंदी आहे.”

“मला वाटतं, तू खूप निष्ठुर आहेस,” थोरला भाऊ म्हणाला. त्याने खिशातून सत्याचा खडा बाहेर काढला आणि त्याचा प्रकाश धाकट्या भावाकडे वळवला. धाकटा भाऊ खोटं बोलतोय, हे खड्याने दाखवले. त्याचा आत्मा खूप संकुचित झाला होता. त्याचे मन भयाने ग्रासले होते. त्याच्या हृदयातील प्रेम आटले होते. थोरला भाऊ गहिवरला. मग त्याने खड्याचा प्रकाश राजकुमारीकडे वळवला. त्यात एक मुखवटा धारण केलेली स्त्री दिसली. ही स्त्री आतून मरून गेली होती. तिचे स्मित घड्याळाच्या टिकटिकीसारखे झाले होते. आपण कुणासाठी स्मित करतोय, याचेही तिला भान नव्हते.



“ठीकाय,” थोरला भाऊ म्हणाला, “जगात चांगल्या गोष्टी आहेत, तशा वाईट गोष्टीसुद्धा आहेत, हे मला कळून चुकलंय. या किल्ल्यात राहून तुझं जेवढं कल्याण होऊ शकतं, तेवढं होवो. पण माझं कल्याण इथे होऊ शकत नाही. मी माझा सत्याचा खडा घेऊन निघालो. माझा प्रवास सुरुच राहील.”

**समाप्त**